#गुलदस्ता... 1

#(तिच्या डायरीतून)

ती :-- तूला आठवतंय? माझ्यावर पोटभर प्रेम करून झालं तुझं की तू म्हणायचास, काय अर्थ आहे या सगळ्याला? दुर्दैव आहे माझं. तू माझी नाहीस आणि या जन्मात कधी होऊही शकणार नाहीस. "

यावर माझं उत्तर . "खरंय तुझं. पण आत्ता, या क्षणात, आपल्या बाहूविश्वात मी फक्त तुझीये."

मग तूझी ठरलेली चिडचिड. मला म्हणायचास, "गप. बोलाचा भात आणि बोलाची कढी नुसती. एखाद्या उत्कट क्षणी तू मला हवी असतेस, अशीच पसरलेली माझ्या मिठीत. तेव्हा कुठे असतेस? रात्री झोपताना आणि सकाळी डोळे उघडल्यावर तू लागतेस मला. तेव्हा कुठे असतेस "?

तू बोलत सुटलास . " तू तेव्हा तुझ्या जगात असतेस. आई, बायको, सून, बहिण या भूमिका पार पाडत. कर्तव्यतत्पर. त्या क्षणापुरती मला विसरलेली. तिरस्कार करतो मी त्या क्षणाचा. आणि मी असतो इकडे. माझ्या जगात. मन रमवण्याच्या बालिश प्रयत्नात. आणि हे बालिश मन प्रत्येक आवर्तनानंतर तुझ्यापाशी येऊन थांबतं. पुन्हा पुन्हा फिरून, लयकारी दाखवून समेवर यावं तसं. का भेटलीस तू मला? "

चिडून दूर ढकलून दिलस मला आणि पुन्हा जवळ घेऊन म्हणालास , " काय उपयोग आपल्या या गोड क्षणांचा, ओढीचा, तासनतास मारलेल्या गप्पांचा. काय होऊन होऊन होणार त्यांच? "

तुझ्या डोळ्यात थोपवलेला निर्झर, स्वतःच्या डोळ्यातून वाहू दिला मी आणि म्हणाले ," सांगू तूला? काय होणार या क्षणांचं?... याचा होणार 'गुलदस्ता'. 'पुष्पगुच्छ'. 'बुके'. *आठवणींचा गुलदस्ता.* रंगीत फुलांसारख्या रंगीत आठवणी. तुझ्यामाझ्या.

त्यात असतील अबोलीची फुलं. हे ते क्षण आहेत राजा, जेव्हा तुझी माझी नुकतीच ओळख होत होती.अबोल असायचो आपण. नजरेने जास्त बोलायचो . मग असेल चाफा त्या गुलदस्त्यात. दरवळाने ओढून घेणारा. जसं तू ओढून घेतलसंच मला, तुझ्याकडे. माझ्या नकळत. मोगरा आणि गुलाबही असतील त्यात. घमघमणारा मोगरा आणि रंगीत टवटवीत गुलाब म्हणजे आपल्यातले भारावलेले क्षण... शारीर, अशारीर सगळेच. जे मी तुझ्याशिवाय आणि तू माझ्याशिवाय साजरे करूच शकलो नसतो. मधेच थोडी तगर ठेऊया. हा 'रूसवा' आपल्यातला. क्षणिक. पण गरजेचा. तोंडी लावण्यापुरता. जेव्हा तुझे माझे अहं जागृत होतात तेव्हाचा.

 © Shivani Gokhale

आणि या गुलदस्त्यात शेवटी कशाची पखरण करायची सांगू? सदाफुलीची. कायम फुललेली. काय वाट्टेल ते होऊदे, वाट्टेल ते... आपल्यातलं नातं कसं फुलतच राहतं? तशी ही सदाफुली.

काय?...... कसा दिसतोय सांग बरं आता हा गुलदस्ता? परत विचारू नकोस या क्षणांचं काय होणारे म्हणून. "

आणि मग तू माझं तोंड बंद केलंस कितीतरी वेळ. इतकं की श्वास घेणं मुश्किल झालं होतं मला . त्यानंतर कधीच तू हा प्रश्न विचारला नाहीस.

तूला आठवतंय ना? ����

©शिवानी गोखले.

#गुलदस्ता.....( 2)

#(तिच्या डायरीतून)

तुला आठवत्ये? ती संध्याकाळ.

कुठलीशी गाण्याची मैफिल संपवून निघालो होतो आपण. बराच उशीर झाला होता. पावसाळीच होते दिवस. आपण बाहेर आलो auditorium मधून तर पाऊस रिमझिमायला लागला होता. कशीबशी रीक्षा शोधून स्टेशनला आलो आपण.

मी म्हणाले, "जा आता तू घरी. मी जाईन ट्रेनने."

तर म्हणालास, "नाही नाही. 11 वाजत आलेत. तू एकटं नाही जायचस. मी येतो सोडायला. तूला घरापर्यंत सोडेन आणि लगेच ट्रेन पकडून परत येईन."

"बरं. चल." मी म्हणाले.

आपण माझ्या घरापर्यंत येतोय तोवर पाऊस कोसळायला लागला होता. धुमधार.... पूर्ण भिजलो होतो आपण तोवर. मग मीच म्हणाले तुला," खूपच पाऊस आहे रे. चल घरी. कसा स्टेशन गाठणारेस एवढ्या पावसात?थोडा थांब. जोरात सर आल्ये. ओसरेल. मग जा. " आणि तू आलास.

पंधरा मिनिटं झाली.. अर्धा तास झाला. पाऊस काही थांबेना. तू दारापर्यंत जायचास. मग मी खिडकी उघडून बघायचे., तर रपारपा कोसळतच असायचा पाऊस.

" नकोच जाऊस. " मी म्हणाले.

" नको जाऊ? खरंच? आणि काय करू? " एकदम अंगावरच आलास तू. भिजलेला. गच्च ओला.

"अरे असं काय?" मी

" कसं काय?"  तू

"जा तू. आत्ता निघून जा. नको थांबूस." मी ढकलून दिलं तुला.

जायला लागलास मग तू. माझ्या डोळ्यात बघत. माझी नजर झुकली आणि पायातल्या चपला भिरकावून परत आलास.

मला म्हणालास," हे बरोबर आहे?"

"काय?" मी विचारलं.

"हे. जे काही आता होणार आहे. "

" मला माहीत नाही."

आणि मग.........

पाऊस खरोखर थांबलाच नाही त्या रात्री. कोसळतच राहिला. बेभान. अनावर. आणि तू ही. जणू काही सगळा हिशोब एका रात्रीत चुकता करायचा होता.... दोघांना.

पहाटे कधीतरी ओसरला असावा. तू ही तेव्हा दमून झोपला होतास. तरी एका हाताने मला ओढत होतास आणि म्हणायचास, "तिकडे नको जाऊ. इकडे ये. माझ्याजवळ रहा. रागावली नाहीस ना माझ्यावर?"

"का रागवायच?" मी विचारलं

"आपण जे काही केलय ते समाजमान्य नाही." तू म्हणालास.

"कोण समाज? आणि अशा अंधाऱ्या पावसाळी रात्री नक्की काय करतो हा समाज? जे काही झालय ते आपल्या दोघांनाही मान्य होतं. मग का रागवायच मी तुझ्यावर?

तर हसलास आणि पुन्हा एकदा तयार झालास माझ्यात विरघळायला... माझ्या डोळ्यात खोलवर बघत.

पहाट होऊन गेली होती. पाऊस शांत झाला होता. आणि आपणही., पुन्हा विरघळण्यासाठी... एकमेकांमधे.

कित्येकदा तसा अनावर पाऊस भेटला मग आपल्याला.... बेभान.. बेफाम. आणि अजूनही तेवढीच अनावर आहे ओढ... त्या पावसाची

तुला आठवतय ना?

©शिवानी गोखले.

#गुलदस्ता..... (3)

#(तिच्या डायरीतून)

तुला आठवतंय? तू एकदा मला विचारलं होतस, " कशी काय ओढली गेलीस गं तू माझ्याकडे? म्हणजे इतकी classy तू.कलाप्रेमी. तुला पहिल्यांदा पाहिलं ना तेव्हा हेच आलं मनात.. की यार,.. कसला लकी असेल यार हिचा नवरा. सगळं जागच्या जागी असलेलं आयुष्य तुझं. इतकं settled life. कसलीच कमी नाही. A perfect family picture."

तू असं म्हणालास आणि, मी मोठमोठ्यानं हसत सुटले. वेड्यासारखी. कितीतरी वेळ. दोन मिनिटं पाहिलस तू. आणि मग मी बसले होते त्या सोफ्याजवळ येऊन उभा राहिलास. माझा चेहरा दोन्ही हातात धरून म्हणालास," काय साचलय आत? किती साचलय? येऊ दे आज सगळं बाहेर. "

मी मग कोसळल्यासारखी रडायला लागले. तुझ्या कमरेला वेढा देऊन. बोलता येतच नव्हतं मला. तू शांत केलंस. शेजारी बसलास. तुझ्या खांद्यावर डोकं ठेवलं मी. माझ्या हातात हात गुंफलास तू. आणि मी बोलायला लागले.

" तुला एका वाक्यात देऊ या प्रश्नाचं उत्तर? हे जे काही तू आत्ता वागलास ना, मी रडायला लागल्यावर. हेच सगळं माझ्या नवऱ्याकडून हवं होतं मला. पण कधीच नाही मिळालं. कधीही नाही. माझ्या डोळ्यात कधी पाणी यायचं ना, तेव्हा माझा स्वभाव रडाच असं वाटायचं त्याला. आतमध्ये खूप काही धगधगत असू शकतं असा विचार करून पाहिलाच नाही त्याने. "

" तुला खरं सांगू, बायकोला काय हवं असतं नवऱ्याकडून?. तिला हवा असतो त्याचा सहवास. नुसता शारीरिक नाही हं. तिच्या मनात गुंतलेल्या त्याच्या मनाचा सहवास. खुपदा म्हणायचे मी त्याला. ऐक ना रे. चल ना माझाबरोबर walk ला कधीतरी. एकटी कंटाळते रे मी.आज खुपच low वाटतय मला. Please आजच्या दिवस ये ना माझ्यासोबत. तर नाहीच म्हणायचा. आणि यावर जर माझी चिडचिड झाली तर म्हणायचा, जा कोण येतोय तुझ्यासोबत त्याला घेऊन . मला नको bore करूस. "

" कधी मी म्हणायचे त्याला, मला बोलायचय तुझ्याशी, तुझ्या कुशीत शिरून. Please घे ना मला जवळ. पण त्याला sex सोडूनही बायकोच्या जवळ यायचं असतं हे कळायचच नाही. एकदा त्याला म्हणाले मी की आज जाऊया ना आपण सिनेमाला. खूप एकटं वाटतयं. एवढे दिवस माझा भाऊ होता ना रे रहायला. आई घरी नव्हती म्हणून का होईना.. आला ना ताईकडे रहायला. वीसेक दिवस होता रे तो. आणि आता तो गेलाय तर घर अगदी रिकामं वाटतयं. चल ना जाऊया. "

"तर म्हणाला, त्या तसल्या भंपक सिनेमावर मी माझा वेळ आणि पैसा खर्च करणार नाही."

मी म्हटलं, "सिनेमावर नाही रे... माझ्यावर तर करशील?"

 © Shivani Gokhale

तर चिडला एकदम. ओरडायला लागला., "गप गं. तुला ना रडायची सवयच आहे. You always crib. I am least bother about you. तुला मैत्रिणी नाहीत त्याला मी काय करू. त्यांनाही असच bore करत असणार तू. तुझ्या आईला घेऊन जा सिनेमाला. आल्ये ना आई आता ट्रिपवरून. "

" अरे मैत्रिणी आहेत रे मला. आणि आईही लगेच होईल तयार यायला. पण मला तुझी आस वाटते रे. तुझ्याबरोबर वेळ घालवावासा वाटतो मला. "

" मला आत्ता वेळ नाही. महत्त्वाचे email चेक करून reply करायचेत. "

" अरे पण हे तर नेहमीचच कारण आहे तुझं. बरं. तुझं काम आटपलं की जाऊया? "

" माझं डोकं खाऊ नकोस. "

" इतका जोरात ओरडायचा ना अंगावर. इतकं insulting वाटायचं मला. मग लोक लाजेस्तव म्हणा किंवा तेवढं ओरडायची माझ्यात ताकद नाही, म्हणून म्हणा. मी गप्प बसायचे. क्षीण आवाजात पुटपुटत रहायचे, नको येऊस. पण ओरडून का गप करतोस मला? आणि I am least bother about you हे म्हणायलाच हवय का दरवेळी. "

" हे असलेच संवाद वर्षानुवर्ष घडत राहिले आमच्यात. एक अनामिक अशी पोकळी होती आयुष्यात. नंतर नंतर तर मला खरच वाटायला लागलं होतं की मी रडीच आहे. मला दुसरं काही जमणारच नाही. सतत माझा नवरा आरोप करतोय  म्हणजे नक्की काहीतरी कमी माझ्यातच आहे. आणि मग... तू आलास माझ्या आयुष्यात. त्यावेळी मनाने पूर्ण संपले होते मी. तुला जितकी माझ्यात positivity दिसली ना.. तेवढी माझ्यात आहे हेच विसरुन गेले होते मी. "

" काही म्हण पण माणसाला माणूसच लागतो. किती credit cards देऊन बायकोला पाठवून दिलं ना shopping ला तरी नवऱ्याच्या हातात हात गुंफून रस्ता ओलांडण्यात जे thrill तिला वाटतं ना त्याला तोड नाही. "

" आणि मी तर लग्नानंतर घर, संसार, नवरा हेच सर्वस्व मानलं होतं. अशावेळी I am least bother about you हे जेव्हा जेव्हा ऐकायचे ना मी.. , मला कानात उकळतं गरम काहीतरी ओतल्यायासारखं व्हायचं. It hurts.. it really hurts.. a lot. "

" हे सगळं टाळता आलं असतं पण तसं व्हायचं नव्हतं. बघ ना आता इतकी वर्ष होऊन गेली आपण एकत्र येऊन पण एकदाही हा संवाद नाही घडलायं आपल्यात. बायको ही व्यक्ती ना actually फार थोड्याने खुश होणारी असते . पण सततची नकारघंटा, बहिष्कार घातल्यासारखं वागणं असं झालं की ती ही बिथरल्यासारखी होते. मग ती उत्तराला उत्तर द्यायला लागते, वाकड्यातच शिरायला लागते किंवा मग अशी बाहेर गुंतवते स्वतःला. "

हे सगळं ऐकून घेतलस तू. माझ्या हातात गुंफलेला तुझा हात तसाच होता अजून. मी तुला म्हणाले," तू नको वागूस तुझ्या बायकोशी असा. तिच्याही कलानं घे "

तर म्हणालास," हे काय... घेतोय की. माझं लग्न झालय... तुझ्याशी. तुझ्याच अजून लक्षात येत नाहीये. जाऊ दे... सोड.

कळेल तुझं तुलाच. माझा जन्मच तुझ्यासाठी झालाय. मग तू मला थोडी उशीरा भेटलीस म्हणून काय झालं. भेटायचो होतोच आपण. "

हे असलं काहीतरी अगम्य बोलायचास तू मध्येच.

तुला आठवतंय ना?

©शिवानी गोखले.

#गुलदस्ता.... (4)

#(तिच्या डायरीतून)

तुला आठवतंय? आपण कसे भेटलो? तू कसं propose केलं होतस मला? Social media वरच झाली होती आपली पहिली भेट. कुठलीशी post होती माझी एका groupवर आणि खूप आवडली होती तुला ती. Directly personal वर येऊन तसं सांगितलं होतंस मला. मी ही Thank you म्हणून ते झटकून टाकलं होतं. असे कैकजण यायचे personal वर. तसाच तू असं वाटलं होतं. पण पुढची कल्पना कुठे होती मला तेव्हा. त्यानंतर रीतसर friend request पाठवलीस तू. ती accept करायच काही कारण दिसलं नव्हतं मला, म्हणून मी नाही केली request accept.

असे अनेक दिवस गेले असावेत. माझ्या Routine मध्ये मशगूल होते मी. तू ही असावास. मग माझी ' ती 'post आली जीचा आजही तू उल्लेख करतोस. एकदम पुन्हा inbox मध्ये आलास. म्हणालास, "मला वेड लावलय तुमच्या त्या postने. Please friend request accept करा ना माझी मॅडम. 8 महिने झालेत आता. मी रोज वाट बघतोय." मला खुदकन हसूच आलं. मी म्हणाले, "तुम्ही मोजलेत महिने?" तर म्हणालास, "महिने? आहो मी दिवस मोजतोय. रोज follow करतोय तुम्हाला. एवढे friends असतील तुमचे.. मग मी का नको? "

" अहो तसं काही नाहीये. Wait. "मी म्हणाले आणि पटकन तुझं profile review करून घेतलं. Engineer होतास तर तू. गायक +संगीतकारही होतास. 'not bad'. मी मनाशी म्हणाले आणि केली तुझी request accept.

लगेच smiling emojis आले तुझे.

आणि मग सुरू झाला एक सिलसिला... गुलदस्ता सजायला सुरवात झाली होती.... माझ्या नकळत... कारण तुझं नेहमी हेच म्हणणं असायचं की, तुला हे सगळं असंच होणार हे माहित होतं. तुझा जन्मच माझ्यासाठी झालाय मग थोडी उशीरा भेटले म्हणून काय झालं.

छान लिखाण होतं तुझं. गहिरं. सगळे प्रकार हाताळायचास. Impress तर झाले होतेच मी. आता हसू येतय आठवलं की पण मग शिरस्त्याप्रमाणे Gm, Gn, TC.... असे दिवसाचा प्रत्येक प्रहर दाखवणारे तुझे msgs सुरू झाले. आता तुला एक गंमत सांगते, कसा बदलत गेलास बघ तू. हळूहळू माझ्याकडून अपेक्षा करायला लागलास. म्हणालास, "तू स्वतःहून केलास तरी चालेल msg कधीतरी." मग करायचे मी ही कधीतरी Gm तुला. पण जेवढ्यास तेवढं बोलणं

असायचं माझं. तुझ्यासारखं भरभरून व्यक्त नाही व्हायचे मी. तर एक दिवस फुरगटूनच बसलास. ते लाल चेहऱ्याचे भुवया आवळलेले emojis पाठवायला लागलास.

मी म्हटलं, "काय झालं रे? "तर म्हणालास," हे काय ग? किती formal बोलतेस तू. हो ना मोकळी तू पण. Open हो. अजून प्रगल्भ होशील." अशा प्रकारे एकेरीवर आलो होतो आपण.

मला तरी कळायचच नाही की अशा नवीन अनोळखी माणसाबरोबर कसं मोकळं open व्हायचं आणि का व्हायचं? मी एकच उत्तर द्यायचे तुला, 'मी मोकळच बोलते आणि प्रगल्भ आहेच मी.' यावर एकदा म्हणालास," नाही बोलत तू. काहीतरी खोलवर दडपल्सासारखी बोलतेस. लिखाणातून कळतं तुझ्या मला."

" Shut up "मी म्हणाले.' Mind your own business. "बंद करून टाकली Chat window. खरं ऐकलं की झोंबतच नाही का माणसाला? तसच झालं असावं माझं. दोन दिवस reply केलंच नाही तुला. पण विचारात पडले होते, कसं काय या माणसाला कळत असावं तिथे बसून? माझ्या मनाचा थांग लागतोच कसा याला?

दोन दिवसांनी केला reply तुझ्या Gm ला. तू म्हणालास, "रागावलीस का?" "नाही". मी. "मग रागावलीस तरी चालेल पण मला तुझा फोन नंबर हवाय."

"काय करायचाय माझा फोन नंबर तुला?" मी विचारलं

"खोटं बोलणार नाही. तुझा आवाज ऐकायचाय. दोन महिने chat करतोय आपण आता. बोलूया की फोनवर. तुला काही खटकलं तर ब्लॉक करून टाक माझा नंबर." तू म्हणालास.

मी विचार केला, देऊया नंबर. Singer आहे, आवाज तरी ऐकूया त्याचा. नंबर पाठवला मी तुला. लगेच विचारलस," करू call?"

"कर. "

" Hello. " तुझा आवाज आला. त्या हॅलोतला 'लो' लांबवला होतास थोडासा. काय आवाज होता रे तुझा. पूर्ण पुरूषी आवाज. धीरगंभीर. Stable. त्याक्षणी फॅन झाले बरंका तुझ्या आवाजाची मी.

"हाय" मी म्हणाले. तर तू बोललास, "ए तू का नाही शिकलीस गाणं. बेस आहे तुझ्या आवाजाला. " तसं इकडचं तिकडचं बोललास तू. तुझ्या गाण्याच्या कार्यक्रमाची जुळवाजुळव सुरू होती त्यावेळी. तूच बांधल्या होत्यास चाली. खूप gel होऊन बोलत होतास तू. मी फक्त, "wow.. Great.. Hmm" असंच करत होते. पाऊण तास बोललो आपण तेव्हा. फोन ठेवताना तू म्हणालास, "परत कधी बोलायचं? कधी करू फोन?" मी म्हणाले "सांगते." मग जवळजवळ रोज बोलायचो आपण. मला openly बोलता यायचं नाही घरून पण तू बिनधास्त बोलायचास. आणि काही वाक्य common असायची तुझी, "मोकळी हो. Open हो. निदान माझ्यापाशी तरी." आणि एक दिवस डोकं सटकलं माझं, "काय रे? मोकळी हो open हो म्हणजे काय म्हणायचय तुला. कुठल्या दृष्टीने open?"

तर निर्लज्जपणे म्हणालास, "सगळ्याच दृष्टीने"

"हे बघ. माझं लग्न झालय" मी

"माझं नाही झालं" तू

"मला family आहे "मी

" मलाही आहे. "तू

" मी तुझ्यापेक्षा मोठी आहे."

"मी तुझ्यापेक्षा लहान आहे. मग? "

" मी पांढरपेशा समाजातली आहे. सरळमार्गी जगतो आम्ही. "

" मी ही पांढरपेशाच आहे. नोकरी करूनच वाढवलय आम्हाला आई बाबांनी. एक बहीण आहे मला. I am 32. तीन affairs झाल्येत college days मध्ये, त्यानंतर नाही. Believe it or not... I don't care पण मी virgin आहे. Chance मिळालाच नाही कधी हे मोठं कारण आणि कदाचित तुझी वाट पहायची होती हे दुसरं कारण असावं असं आता वाटतंय. तू 4-5 वर्षे मोठी असावीस मान्य. पण तू कोणाला आवडू शकतेस की नाही याचा criteria असू शकत नाही ना हा? मला खूप आवडतेस. तुझ्याशी जेवढं openly बोलतो Chat वर, फोनवर तेवढं कुठल्याही विरूद्धलिंगी व्यक्तीशी बोललेलो नाही. मी स्वतःला जोडून घेतलय तुझ्याशी. तुझ्यावर कुठलीही जबरदस्ती नाही. पण तू साथ दिलीस तर सावलीसारखी सोबत करीन. आणि सरळमार्गी जगणं म्हणजे मन मारून जगणं नाही. एकदा भेटूया आता. "

तू थांबलास. मी अवाक झाले होते. डोकं भणभणत होतं. काय बोलावं कळत नव्हतं पण बोलून गेले," भेटूया आपण. "

तुला आठवतंय ना?

©शिवानी गोखले.

#गुलदस्ता... (5)

#(तिच्या डायरीतून)

तुला आठवतंय?

तुला भेटायचं कबूल केलं मी, पण तब्बल तीन आठवडे टाळत राहिले. काय गरज आहे भेटायची? काय निष्पन्न होणारे? आणि कशासाठी वाढवायचा विषय आपण? एकदाच त्याचा नंबर आणि Profile block करून टाकलं तर? पुढे जायलाच नको. अशी सगळी माझी मानसिक आंदोलनं चालू असताना तू मात्र firm होतास. त्या तीन आठवड्यात एवढी सवय लावलीस तू मला स्वतःची. Just उठलो पासून just जेवलो पर्यंत प्रत्येक मिनिटाचं update द्यायचास मला. दर दोन तासांनी "call करू?" असं विचारून हैराण करायचास.

आणि तो दिवस आलाच. आपल्या भेटण्याचा. तुझ्या शहरात भेटायचं ठरलं. मी ट्रेनने आले होते आणि तू बाईकवरून. शुक्रवार होता. संध्याकाळचे पाच वाजले होते. तू आधीच येऊन उभा होतास त्या कॅफेच्या बाहेर. मला उशीरच झाला यायला पंधरा मिनिटं. तुझे मेसेजवर मेसेज सुरू होते. पोचले एकदाची मी धावतपळत. त्यावेळी बोलले नाही, पण आता सांगते.... पक्का handsome दिसत होतास. आडव्या stripes चा full sleeves चा T shirt घातला होतास तू. डोळ्याला गॉगल.. भरपूर.. काळेभोर केस.. नीट side partition केलेले. खुरटी दाढी मिशी ठेवली होतीस. सावळाच रंग. व्यवस्थित उंच आणि gymming करतोस हे दाखवणारी ठेवण. आणि I must say.. Smile तर ईतकी दमदार होती तुझी की मी ही अगदी मोकळं हसले होते तुला पाहून. इतकं सगळं छान impression पडलं होतं तुझं माझ्यावर पण मनात विचारांचं काहूर माजलं होतं. त्यामुळे यातलं काही सांगू शकले नव्हते तुला, तरी गॉगलमधून मी ही तुला व्यवस्थित निरखून घेतलं होतं.

तू बाईकवरून ऊतरलास, म्हणालास.. "हाय". Shakehand केलंस. मी हसले.. 'Hello " म्हणाले. तर मान तिरपी करून खाली वाकून माझ्या झुकलेल्या डोळ्यात बघायचा प्रयत्न करत होतास... मी परत हसले.. म्हणाले.." काय झालं? "तर बोललास..." ईतकी कशी गं तू सुंदर? " मी आणखीच शरमले." आत जाऊ या ना. की ईथेच बोलायचंय." मी विषय बदलत म्हणाले.

" yes.. Of course आत जाऊया." तू म्हणालास. दोघं आत गेलो. तुझ्या परिचयाचं असावं ते कॅफे. बरोब्बर का ॅर्नरचं टेबल पकडलस. Well I must say.. कॅफे आणि music झक्कास होतं.

" काय घेणार? "तू विचारलस

"चहा. मी चहा प्रेमी आहे. "मी म्हणाले.

परत वाकून माझ्या डोळ्यात डोळे घालून म्हणालास.." Okk. आपण दोघे चहाच घेऊया." आ ॅर्डर दिलीस. "बोल ना". मला म्हणालास. आधीच मी introvert.. Reserved कॅटेगरीतली.. त्यात नवीन कोणी असेल तर मला वेळच लागतो cope up करायला.

तूच बोलायला लागलास मग.." हे बघ. आपण गेले तीनेक महिने virtually connected आहोत. माझ्या मनातलं मी तुला सगळं सांगितलय. आपल्याला एकमेकांची familybackground, Qualifications, current status सगळं सगळं माहित्ये. So ते बोलण्यात मी वेळ घालवणार नाही. आधीच एवढी वर्ष फुकट गेली माझी असं वाटतंय आता तुला भेटल्यावर. "

" म्हणजे?" मी विचारलं.

" म्हणजे simple. कसली गोड आहेस तू. खूप आवडल्येस मला. तुला खरं सांगतो FB वर मुली पाहण्यात खूप वेळ घालवलाय मी. It's quite natural.. You can understand. But तुला पाठवल्यानंतर एकाही मुलीला friend request पाठवलेली नाहिये. कोणाच्याही inbox मध्ये गेलेलो नाहिये."

मी एकदम हसले.. मोठ्ठयांदा.. तू म्हणालास..." wow. What a smile. "परत एकदा मी सावध झाले. गप्प बसले.

" अगं हस की. बोल की. मी इथे तुला कोणताही होकार नकार कळवायला बोलावलं नाहीये. तू burden नको घेऊस त्याचं. मी माझे विचार तुला सांगितलेत. You can take your own time. पण माझ्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यात

तू मला बरोबर हव्येस. तू हो म्हणालीस तर प्रत्यक्षात आणि नाही म्हणालीस तर माझ्या मनात. पण या जन्मात आता तुझ्यापासून अंतर नाही हे नक्की. "

" असं कसं म्हणू शकतोस तू? अरे तुझ्या आयुष्यात अजून जो टप्पा यायचाय, त्याच्या मी पुढे निघून गेल्ये. तुझं सगळं व्हायचंय. हे बघ असं नको करूस. माझ्या आयुष्यात already एक पुरुष आहे आणि तो माझा नवरा आहे.. आणि.. "

" आणि तरीही तू इथे आहेस. का? नाही विचारणार मी. कारणं काहीही असोत पण तू माझ्यासमोर आहेस आणि हेच माझ्यासाठी महत्त्वाचं आहे. आणि हे ही ऐकून ठेव मी तुला कधीच विसरणार नाही... कधीही नाही. "

" वेडेपणा करतोयस. तुला माहितीये? मी येणारच नव्हते आज

. कशाला उगाच विषय वाढवायचा असं वाटत होतं मला. "

" तेच तर म्हणतोय मी. Inspite of all the odds तू इथे आहेस. एक सांगतो मॅडम. माणसालाना असंच वाटत असतं की मी हे हे ठरवलय तस्सच होणार सगळं. पण ते काही खरं नाही. नियतीने स्वतःचे डावपेच आखलेले असतात. आणि त्यावर हालचालीही सुरू केलेल्या असतात. "

" अरे पण मी married आहे. Do you understand that? "

" yes I do. हे बघ मला माझ्या आयुष्यात तू हवीच आहेस. तू नाही म्हणालीस तर force नाही करू शकणार आणि हो म्हणालीस तर तुला अंतर नाही देणार. आणि मला ना एक कळत नाही लोकांचं... एकदा असा असा path पकडलाय ना मी... मग आता मी दुसरीकडे जायचंच नाही. ही side पकडल्ये ना आता शिक्षणाची की तिलाच धरून बसायचं. एखाद्या engineer ला व्हायचं असेल chef तर बदलावा की त्याने मार्ग. एक नोकरी.. एक track पकडला की त्यालाच धरून पुढची 30-40 वर्ष काढायची. का? मेहनत करायची तयारी आहे ना? मग स्वतःच्या आवडीसाठी करा की तीच मेहनत. हे बघ मला मान्य आहे करीअर आणि लग्न या भिन्न गोष्टी आहेत. पण हे जे झापडं लावून चालणं आहे ना ते मान्य नाही मला. स्वतःच्या आवडी निवडी दुर्लक्षून पुढे जात रहायचं. मनात चरफडत रहायचं. यापेक्षा मोठी शिक्षा नसेल स्वतःच स्वतःला केलेली. "

" तुला कळत नाहीये तू काय करतोयस आणि मला काय करायला सांगतोयस. "मी

" हे बघ मी 32 वर्षांचा आहे. मला पूर्ण जाणीव आहे मी काय करतोय याची. झापडं काढायची गरज तुला आहे. कळतय का? पुढच्या महिन्यात एक वर्ष होईल मी तुला follow करून. Please बघ ना इकडे. माझ्या डोळ्यात बघ ना. ऐक ना.. फक्त एकदा तुझं लग्न झालय हा विचार बाजूला सारून माझ्याकडे बघ.. Please एकदाच. "

आणि मी बघितलं तुझ्या डोळ्यात. पिंगट brown टपटपीत डोळे होते तुझे. मी कबूल करते त्या क्षणी मला असं वाटून गेलं की हेच डोळे शोधत होते कदाचित.

" निघूया? "मी म्हटलं. तीनेक तास झाले असतील आपल्याला तिकडे.. पण एकदा चहा देऊन गेलेला वेटर परत आलाच नव्हता disturb करायला.

जिने उतरताना माझ्या बोटांना बोटं घासलीस. मुद्दाम. कळलं होतं मला ते. "तुला स्टेशनवर सोडतो बाईकवरून." तू म्हणालास.

मी म्हणाले... "नको. मी रीक्षेने जाते." तर रीक्षेच्या मागे आलास स्टेशनपर्यंत. मी गाडीत चढेपर्यंत माझ्या बरोबर होतास. जाताना म्हणालास... "सावलीसारखी सोबत करेन तुला. विसरू नकोस."

गाडी सुटली. तू स्टेशनवर राहिलास. पण तू माझ्यावर रोखून धरलेले डोळे रूतले होते काळजात. ते बरोबर घेऊन निघाले होते. कायमचे.

तुला आठवतंय ना?

©शिवानी गोखले.

#गुलदस्ता... (6)

#(तिच्या डायरीतून)

तुला आठवतंय?

आपली पहिली भेट झाल्यानंतर घरी आले मी. खूप मिश्र होत्या तेव्हा भावना मनात. सुखावल्याच्याही. मी कोणाला तरी आवडू शकते यावरचा माझा विश्वास परत मिळाल्यासारखा वाटत होता मला. आणि अपराधीपणाची भावनाही दाटून आली होती. त्या दिवसानंतर माझं द्वंद्व सुरू झालं. माझ्या स्वतःशीच. आणि या द्वंद्वाचा फटका तुला बसला. दरवेळी. कित्येकदा भावनाविवश होऊन सगळं संपवायला निघाले होते मी. पण तू कुठल्या मातीचा बनला होतास कुणास ठाऊक? माझी प्रत्येक भावना, प्रत्येक प्रश्न यांना ईतका खंबीरपणे सामोरा गेलास तू. जसं काही हे सगळे प्रश्न तुला अपेक्षितच होते. त्यांची उत्तरही असायची तुझ्याकडे.

यातला एक मोठा, मला सतत कुरतडत राहणारा प्रश्न होता.... मी फसवत्ये का माझ्या नवऱ्याला? यावरच तुझं उत्तर काहीतरी वेगळंच होतं. पण विचारात पाडणारं होतं.

तू म्हणालास. " हे बघ. लग्नानंतर इतक्या वर्षांनी का होईना तू माझ्याकडे ओढली गेलीस. हे सत्य आहे आणि हे तू स्वीकार आधी. आता हे चूक की बरोबर यात नको पडूया आत्ता. तुझ्या सांगण्याप्रमाणे तुझा नवरा रसच घेत नाही घरात. तुला समजूनच घेत नाहीये. पण असं का? त्याचा स्वभावच तसा आहे की दुसरं काही कारण आहे? "

'म्हणजे?' मी विचारलं.

"आता बघ ना. तो सारखा घराबाहेर असतो. रात्री अगदी 2 वाजता सुद्धा मोबाईलवर असतो. तू विचारलसं की म्हणतो आॅफीसच्या email ना रिप्लाय देतोय. असेल.. Ok.. But दररोज. इतकं late night?. काय असं आहे की त्याला तुझी.. घराची ऊब जाणवूच नये? "

"तुला काय म्हणायचय नक्की? "मी वैतागले.

तर म्हणालास ," my dear.. न्यूटनचा third law माहित्ये का तुला?

For every action, there is an equal and opposite reaction. म्हणजेच जर तुला माझ्याकडे ओढलं जावसं वाटलं याचं कारण कदाचित त्याच्या बाहेर involve असण्यात असू शकतं आणि म्हणूनच may be त्याची ती action तुझ्या या वागण्यातुन balance करू पाहतय आयुष्य ! हे बघ not necessary की हे असंच असेल.... But नसेलही कशावरुन? निसर्ग Balance करतोच गं स्वतःला बरोब्बर. आपण आपले त्याचे आपल्या कुवतीप्रमाणे आणि मनःस्थितीप्रमाणे अर्थ लावत बसतो. आणि त्रास करुन घेतो. तू मला भेटायची होतीस, भेटलीस. That's all. मला एवढंच माहित्ये. आणि हे जे सगळं आत्ता मी बोललो यातून जर तू असा अर्थ काढणार असशील की मी तुझी समजूत काढावी म्हणून काहीतरी बोलतोय किंवा तुझ्या डोक्यात तुझ्या नवऱ्याविरूद्ध काहितरी भरतोय.. तर तसं समज. I don't mind. पण तू मला हव्येस आणि मी जे बोललो ते तर्कशुद्धच बोललो. तू माझ्याजवळ रहावीस म्हणून आयुष्यभर असे तर्कवितर्क लढवत बसेन मी. "

असं बोलून कचकन डोळा मारून हसलास तू. " नको गं फार विचार करूस. " असं म्हणून माझ्या कपाळावर ओठ टेकवलेस तू आणि लांब श्वास घेऊन मला ओढून घेतलस श्वासाबरोबर. पहिल्यांदाच त्यादिवशी समुद्रकिनाऱ्यावर आलो होतो आपण. तो ओला भणाण वारा, मावळतीचा सुर्य, मला जवळ घेऊन बसलेला तू आणि तुझ्या खांद्यावर मान टाकून लांबवर बघत बसलेली मी. बास. तो क्षण तिथेच गोठवून टाकावा असं वाटलं मला तेव्हा.

मी म्हणाले, "I am sorry. माझा भावनिक कल्लोळ झाला की मी तुला त्रास देते. तोडून टाकते. पटकन.

" पण मी कुठे तुटू देतोय? सहा महिने होऊन गेले की मॅडम आपल्याला भेटून. बरं ऐक. पुढच्या weekendची गाण्याच्या मैफिलीची दोन तिकिटं आहेत माझ्याकडे. आणि तू म्हणाल्येस तू free आहेस तेव्हा."

"हो रे. जाऊया '

पण तेव्हा कुठे माहित होतं त्या मैफिलीनंतर बेभान करणारा पाऊस भेटणारे आपल्याला.

तुला आठवतंय ना?

©शिवानी गोखले.

#गुलदस्ता... (7)

#(तिच्या डायरीतून)

तुला आठवतंय?

एक प्रश्न विचारून कायम भंडावून सोडायचास तू मला. सारखं म्हणायचास.... " सांग ना. त्याच्याजवळ असताना माझी आठवण येते तुला? कधी घेतलं होतं त्याने इतक्यात जवळ?.. सांग की"

आणि एक दिवस मी जोरात ओरडले होते तुझ्यावर.. कदाचित पहिल्यांदाच...... " हो" किंचाळून म्हणाले मी. " तूच feel होतोस मला. त्याच्या छातीवर डोकं असतं माझं तेव्हाही असच वाटतं की कधी एकदा येऊन तुझ्या छातीवर डोकं ठेवत्ये. डोळे मिटून घेते त्याचा हात अंगावर फिरायला लागला की. तूच आहेस असं वाटून घेते आणि पार पाडते तो प्रसंग. पूर्णपणे द्विधा करून टाकल्येस तू माझी. दोन तुकड्यात फाडून ठेवलयस . मन तुझ्याकडे आणि देह तिकडे वावरतो माझा. आणि हो... हे ऐकून तुझा ego सुखावतो माहित्ये मला. मी त्याची बायको असल्याचा सूड उगवतोस तू. "

मी बेभान झाले होते." आणि हे जे तू lecture देतोस ना मला. मनाचे तीन कप्पे कर. तिसऱ्या कप्प्यात आपली आवड जपायची. हे तीन कप्पे एकत्र करायचे नाहीत वगैरे वगैरे... तर ऐक.. मी सामान्य माणूस आहे. आणि किती आटापिटा केला तरी एखाद्या हळव्या क्षणी हे तीन कप्पे होतातच एकत्र. सगळी भेळ होऊन बसते. मग त्याच्यात तू feel होतोस. तुझ्याबरोबर असताना तो आठवून जातो. आणि हे असंच असणार.. होणार. अभिमान आहे मला मी सामान्य माणूस असल्याचा. या सगळ्या भावनिक कोलाहलाचा! नाही व्हायचं मला आणि संत.. महान.. जी मी आहे तशीच्या तशी स्वतःला स्वीकारणं हे महत्त्वाचं वाटतं मला. तुला काय रे. तू सडाफटिंग आहेस. ठेऊन बघ दोन दगडांवर पाय.. म्हणजे कळेल तुला. पण मी ना... तशी वेळंच येऊ देणार नाही तुझ्यावर. तुझी बायको आली तुझ्या आयुष्यात की मी बाजूला होणार. "

असं म्हटल्यावर करकचून हात पिरगाळला होतास तू माझा.

आई गं! अजून तो जोर जाणवतोय मला. मग म्हणालास...." इतकं सगळं असतं तुझ्या मनात? ... एवढी गुंतागुंत? मी होऊ का बाजूला तुझ्या आयुष्यातून मग? "

चपकन गालावर ओढली होती मी तेव्हा तुझ्या. डोळे लाल करून मग कवटाळून बसला होतास मला कितीतरी वेळ. म्हणाला होतास, " मला नाही आवडत तुला कोणी हात लावलेला. त्यानेही नाही. त्रास होतो मला... खूप. " बोलता येईना तुला पुढे.

मीच म्हणाले.." तुला कळतय ना आपल्याला वाटतय तितकं हे सोपं नाहियेे. सध्या हे फक्त आपल्या दोघांच्या भावनिक पातळीवर आहे. अजून आपल्या घरचे यात गुंतलेले नाहीत. विचार कर असं झालं तर काय होईल? "

 © Shivani Gokhale

" तू पण एक लक्षात ठेव हा सगळ्या भावनिक मारा सहन करेनच पण तसंच काही झालं तर दुनियेलापण पुरून उरतो की नाही बघशीलच तू.. युद्ध सुरु झालयं. सध्या आपल्यातच आहे.. मानसिक युद्ध. पण मी घाबरत नाही कशाला. कशालाच. "

माझ्या डोळ्यात डोळे घालत म्हणालास आणि माझा हात झटकून उठून गेला होतास.. रागाने फणफणत. मीच येऊन मागून बिलगले होते तुला. डोक्यात विचारांचा भुंगा घेऊन. तुझे शब्द घुमत होते डोक्यात. " युद्ध सुरु झालंय "

तुला आठवतंय ना?

©शिवानी गोखले.

#गुलदस्ता... 8

#(तिच्या डायरीतून)

तुला आठवतंय?

माझा फोन लागला नाही किंवा आला नाही तर तू वेडापिसा व्हायचास. खुप तळतळून सांगायचास मला की, ' यार तू फोन का नाही receive करत. आणि तुला माहित्ये ना, मी directly मला पाहिजे तेव्हा तुला नाही call करू शकत. But तू offline तरी राहू नको ना यार. वेड लागायचं बाकी असतं मला. तुला कळत कसं नाही? "

मी ही धडपड करून, मला वेळ मिळेल, संधी मिळेल तशी तुला Call करून घ्यायचे. तू तसं सांगितलच होतस मला.. की मी तुला कोणत्याही क्षणी Call करू शकते आणि खरोखर माझा कुठलाही call तू receive केला नाहिस असं झालंच नाही कधी. मग भले तू office मध्ये असलास किंवा रियाज करत असलास तरीही. अगदीच नाही झालं आपलं बोलणं तरी तुझ्या प्रत्येक पोस्टला उत्तर द्यायचेच मी. त्यामुळे रात्री झोपताना निश्चिंती असायची एकमेकांबद्दल आपल्याला.

पण, ती रात्र तो दिवस वेगळाच होता.

रात्री 8 वाजता आपलं शेवटचं Chatting झालं त्यादिवशी. आणि त्यानंतर मी येऊच शकले नाही online. शुद्धीतच नव्हते मी. रात्री 8 वाजता तुला Bye केलं आणि 8:15 ला माझ्या भावाचा फोन आला, " ताई आईला admit केलय.. श्वास घ्यायला त्रास होतोय तिला."

" अरे! आत्ता तर बोलले मी आईशी सात वाजता. छान गप्पा मारल्या की तिने. हे बघ ॲसिडीटी.. गॅस हे असंच काहीतरी असेल. वाटेल बरं... मी येतेच." मनातून घाबरलेली मी त्याला समजावत होते. धावतपळत पोचले हॉस्पिटलला तरी 10 वाजून गेले होते. माझा नवरा केदार तेव्हा दिल्लीत होता.

आई ICU मध्ये होती. मास्क लावला होता तोंडाला. मी आलेलं पाहिलं तिने दारातुनच आणि उजवा हात वर केला, मला बोलावल्यासारखा... मी जवळ पोचत्ये तिच्या तेवढ्यात तिला उलटी झाली. रक्ताची गुठळी पडली. डॉक्टर.. नर्सेसची धावाधाव उडाली एकदम.... आरडाओरड सुरू झाली. एकीने आधी मला खेचून बाहेर काढलं. पाऊणएक तास झाला असेल. डॉक्टर बाहेर आले..... " severe cardiac arrest. I am sorry.." मला ऐकूच येत नव्हतं. दिसतही नव्हतं समोरचं. अश्रू ओघळायलाच तयार नव्हते. डोळ्यातच तळं करून बसलेले. माझी लेक पियू.. प्रिया.. 16 वर्षांची होती तेव्हा. मला घट्ट जवळ घेतलं तिनं. " आई आजी नाहिये आता. मामा.. ऐकतोयस ना." माझ्या भावाला म्हणाली. त्याने मोठ्याने हंबरडा फोडला".. आई... आई गं"...

माझ्या मावशा.. मामा सगळेच लांबून यायचे होते. म्हणून आईला तिथेच ठेवलं. दुसऱ्या दिवशी दुपारनंतर आणलं घरी. केदारही आला होता तोवर. मला काहीच उमगत नव्हतं. रडायचही भान नव्हतं. बधीर झाले होते जणू. सात वाजता आई माझ्याशी बोलते काय आणि दहा वाजता जाते काय?? विश्वास बसत नव्हता.

इकडे तुझ्याशी contact होऊन 24 तास होत आले होते. तू वेडापिसा झाला होतास. गेल्या तीन साडेतीन वर्षात असं पहिल्यांदाच होत होतं. तुझा संयम संपला एका क्षणाला आणि तू माझ्या घरी पोचलास संध्याकाळी. घराला कुलूपच होतं. शेजारच्यांची बेल वाजवलीस.

" अनुष्का सोहोनी नाहीयेत का घरी?" तू विचारलस.

"नाही. आहो त्यांची आई गेली ना काल रात्री. तिकडेच गेलेत सगळे."

" what? अरे बापरे. मला काहीच कल्पना नाही हो याची." तू म्हणालास.

" अचानकच घडलय सगळं." ते म्हणाले.

तू ताबडतोब निघालास तिथून. तुला माहित होताच आईचा पत्ता. आई माझा श्वास आहे हे तू जाणून होतास. तू भेटेपर्यंत माझी घुसमट ओळखणारी ती एकमेव होती... लग्नानंतर केदारने माझ्यात रस घेतलाच नव्हता त्यामुळे सगळच आईबरोबर share करायची सवय झाली होती मला.

तू पोचलास तिकडे तोवर आठ वाजले होते रात्रीचे. आईला नेऊन तीनेक तास होत आले होते. खूप माणसं होती घरात. तू दारात उभं राहून मला शोधायला लागलास. मी आतल्या खोलीत होते. जोरात ओरडलास दारातूनच..... " अनुष्का "

तुझा आवाज ऐकला मी आणि बधीर झालेली क्षणात भानावर आले. डोळ्यातुन धारा लागल्या. क्षणात जाणवून गेली पोकळी आयुष्यातली... आईविना झालेली. बाहेर धावत येऊन तुला बिलगले... दारातच.. " सोहम...


© Shivani Gokhale

आई गेली रे माझी." तू कवटाळलस मला.. तुझ्या जवळ येताना मागे लक्ष गेलं तर माझा भाऊ.. नवरा सगळेच आले होते जिन्यापाशी.

झपकन केदार पुढे आला आणि एक सणसणीत कानशिलात लगावली माझ्या. सगळंच अवसान गळालेली मी त्या एका थपडेने खाली कोसळले. चक्कर आली मला. डोळे मिटताना मी पाहिलं तेव्हा तू केदारला माझ्यापासून दूर ढकलून दिलं होतस. इतक्या जोरात की तो जाऊन लिफ्टच्या दरवाजावर आदळला होता.

तुला आठवतंय ना?

©शिवानी गोखले

#गुलदस्ता...9

#(तिच्या डायरीतून)

तुला आठवतंय?

आई गेल्यावर तू घरी आलास आणि त्यानंतर बदलूनच गेली एकदम आपली आयुष्य. केदारने हात उचलल्यावर मी जी कोसळले ती एकदम दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलमध्ये शुद्धीवर आले. बी पी खूप लो झालं होतं माझं. त्याच रात्री ॲडमीट केलं होतं मला. दुपारून थोडी भानावर आले. आई गेल्यावर सगळंच थांबलय, आयुष्याला काही वेगच उरला नाहीये असं वाटत होतं मला... पण तो गैरसमज होता माझा.. जो लवकरच गळून पडणार होता.

मी शुद्धीवर आले तेव्हा हॉस्पिटलमध्ये माझ्या खोलीत सुमन मावशी, पियू आणि तू होतास. तुम्हाला तिघांना एकत्र पाहून मी एकदम उठून बसले बेडवर, तशी मावशी म्हणाली " अगं झोप झोप. अशी एकदम नको उठून बसूस." मी कावरीबावरी झाले होते मावशीपुढे. " मावशी अगं!... मी.. तुला.. म्हणजे.." वाक्य जुळवायला लागले मी. तेव्हा तू म्हणालास.. " अनुष्का नको बोलूस काही. सगळ्यांना सगळं माहित्ये इथे." "अरे पण पियूला कशाला?.. I mean कसं काय? "

मी विचारलं. तेव्हा सुमन मावशीच म्हणाली.. " अनुष्का. या तुझ्या लेकीने जाऊन विचारलं याला".. म्हणाली..." सोहम सर..? माझी मम्मा, माझी आज्जी गेल्यावर तुमच्याजवळ का रडली याचं कारण मला कळलच पाहिजे. "

मावशी पुढे म्हणाली, " सगळं कळलय आम्हाला अनुष्का. पण तू कशी काय ईतकी वर्ष गप्प राहिलीस. पियूला माझ्याकडे पाठवलस इंदौरला शिकायला, तेव्हाच खरं तर मी विचारणार होते. पण मग वाटलं माझ्या नातींशी गुळपीठ आहे पियूचं, तिकडे एकलकोंडी झाली असेल.. एकुलती एक आहे ना तुझी प्रिया. पण तुला नाही सांगता आलं की नवरा नांदवत नाही मला म्हणून. तुझी आईसुद्धा कधी काहीच बोलली नाही. "

" अगं मावशी ;.. आई म्हणायची, पियूसाठी घे सांभाळून अनू. बाप लागतोच गं पोरांना." " मग मी ही बदलतील दिवस या आशेवर राहिले. आणि एक दिवस सोहम आला माझ्या आयुष्यात आणि..... आणि मी नाही टाळू शकले त्याला मावशी. I don't know पियू काय विचार करत असेल माझ्याबद्दल. "

तशी पटकन पियू म्हणाली," हे बघ मम्मा. लहानपणापासून मी सगळं बघत आल्ये. आणि frankly.... गेली दोनेक वर्ष तू जेवढी smiling दिसत्येस ना, तेवढी कधीच दिसली नाहीस मला. कायम डोळे भरलेले असायचे तुझे. आणि काल तुला चक्कर आल्यावर डॅडने जो गोंधळ घातलाय ना तिकडे!... Obviously it was not at all new for me but तो काय म्हणाला माहित्ये?... काय समजते ही स्वतःला? हे धंदे काय हिलाच जमू शकतात का? मी ही मजा केल्ये आयुष्यभर पण असं घरापर्यंत नाही घेऊन आलो कुणाला. " आता माझे डोळे झरझर वाहू लागले. " पियू! I am so sorry सोन्या. तुला लहान वयातच हे सगळं असं... "

" No मम्मा. I am grown up now. आणि मला माहित्ये मी तुझी कायमच priority होते आणि आहे. तुम्हा दोघांना बघत आल्ये मी लहानपणापासून. तुला स्वतःचा आनंद शोधायचा अधिकार आहे आई. " फार emotional झाली की पियू मला आई म्हणायची.

" याचा अर्थ मी डॅडला तोडून टाकेन असा नाही. पण तू आता नको compulsion करून घेऊस माझ्यासाठी डॅडला धरून रहाण्याचं. "

सुमन मावशी म्हणाली," हे बघ. आम्ही दोघी सकाळी जाऊन सोहमच्या आईला भेटून आलोय. थोड्या नाराज आहेत त्या पण प्रेमळ वाटल्या. मला म्हणाल्या," आम्हाला हे सगळं केव्हाच माहित झालय. सोहम गाण्याच्या प्रत्येक मैफिलीला तिला घेऊन यायचा. आहो हि त्याला भेटल्यावर सहा महिन्यात वेगळा फ्लॅट घेतला सोहमने. आधी आम्हाला वाटलं वरकरणी थातुरमातुर असेल प्रकरण. एवढ्या मोठ्या मुलाला काय समजावणार. पण नाहीच. आता तीन साडेतीन वर्ष झाली की. मग म्हटलं कर बाबा काय करायचय ते. ती तर ती.. पण हो एकदाचा सेटल आयुष्यात. " " तर मला म्हणतो कसा... . आई गं. ती हो म्हणाली ना लग्नाला.. दुसऱ्या सेकंदाला करतो बघ लग्न. पण ती अडकल्ये गं. " मावशी तुझ्या आईबद्दल सांगत होती. तू माझ्याकडेच पाहात होतास.

तेवढ्यात धाडकन दार ढकलून केदार आत आला. तू एकदम उठून त्याच्या पुढ्यात जाऊन उभा राहिलास. डोक्यावर पट्टी होती त्याच्या. दोन टाके पडले होते. आदल्यादिवशीच्या तुमच्या धक्काबुक्कीचा हा परिणाम होता तर. तुझ्याकडे दुर्लक्ष करत तो मला म्हणाला," हे बघ ए... माझ्या लायकीची नाहीस तू. कधीच नव्हतीस. परत पाऊल टाकू नकोस माझ्याकडे. Divorce file करतोय मी."

 © Shivani Gokhale

" केदार." सुमन मावशी मोठ्ठ्याने म्हणाली. " अरे रस्त्यावर नाही पडलीय ती. आम्ही आहोत अजून. मी इंदौरला घेऊन जात्ये तिला माझ्याकडे. लग्न करणार आहेत ही दोघं. काय करायचंय ते करून घे. तेवढा divorce लवकरात लवकर file कर. आणि हे बघ,.. या पुढच्या आयुष्यात तरी ही गुर्मी कमी कर थोडी."

" पियू? तू येत्येस माझ्याबरोबर? "केदारने पियूला विचारलं." येस डॅड. मी आत्ता येत्ये. पण मम्मा बरोबर मीसुद्धा जाईन सुमन आजीकडे. कॉलेज बुडतय माझं. आणि इकडे आले की तुझ्याकडे येत जाईन. तू माझा डॅड आहेस आणि मी तुझी मुलगी.. हे मी तुला विसरू देणार नाही. "

तू, मी आणि सुमनमावशी बघतच राहिलो होतो पियूच्या या अवताराकडे. तिच्या डॅडसारखीच तडकफडक उत्तरं देऊन तीच ताब्यात ठेवेल त्याला असं वाटून गेलं तेव्हा.

तुला आठवतंय ना?

©शिवानी गोखले.

#गुलदस्ता... 10

#(तिच्या डायरीतून)

तुला आठवतय??

आईची दिवस कार्य झाल्यावर मी सुमन मावशीबरोबर इंदौरला निघून गेले. ईकडे केदारने divorce file केला होताच. सहा महिन्यांत सगळी procedure पूर्ण झाली. तू तेव्हा प्रत्येक weekendला इंदौरला यायचास. तिथलं हॉटेल Prestige, weekend home झालं होतं तुझं. माझी सुमन मावशी ,मला वाटलं नव्हतं एवढ्या प्रगत विचारांची होती. आईची उणीव तर तिने भरून काढलीच माझ्या, पण तुझंही खूप कोड कौतुक केलं. खूप फिरलो आपण तेव्हा. इंदौरच काय सगळा मध्य प्रदेश पालथा घातला होता. माझा विश्वासच बसत नव्हता की ईतका मोकळा श्वास मी ही घेऊ शकत्ये. इतकी शांत झोप, शांत रम्य सकाळ मी अनुभवलीच नव्हती कित्येक वर्षात.

माझा आणि केदारचा divorce झाला आणि पंधरा दिवसांत आपण लग्न केलं. कोर्ट मॅरेज. एवढे वर्ष आपल्यावर नाराज असलेले तुझे आई - बाबा एकदम खुशीत आले होते. तुझी lawyer असलेली बहीणही आली होती. सिंगापूरला रहायची ती. तिकडेच practice करायची. तिचा स्वभावही माझ्या सुमन मावशी सारखाच वाटला मला... तडकफडक. पण माझ्याशी खूप गोड वागली. एकूण तुझी बहीण, माझी मावशी आणि पियू.. तिघींचा छानच रॅपो जमला होता... त्यांच्या मिळत्याजुळत्या स्वभावामुळे असावा. तुझं friend circle पण खूप happening होतं. खूप

पटकन gel झालो आम्ही सगळे. त्यादिवशी आगाऊपणे पियू मला म्हणाली... " मम्मा..! मी अजून थोडी मोठी झाले ना की एक पुस्तक लिहिणार आहे आणि त्याचं नाव काय ठेवणार सांगू? .. " My Mom's Wedding. " तुझ्या बहीणीने गमतीत एक धपाटा घातला होता तिला.

दुसऱ्या दिवशी तुझ्या आईने सत्यनारायणाची पूजा ठेवली होती. त्यावेळी मला राहून राहून तुझं एक वाक्य आठवत होतं. तू पूर्वी म्हणायचास, " हे कधीच शक्य नाही ना आपल्याला? जोडीनं पुजा करायचं सुख?" मी म्हणायचे" या जन्मात तरी नाही." आणि आजचा दिवस होता आपण पुजेला बसलो होतो. सगळं छान पार पडलं. पियू इंदौरला गेली सुमन मावशीबरोबर. खूप रडलो आम्ही एकमेकींच्या गळ्यात पडून. तू म्हणालासही , " पियू. तू कुठेही जायचं नाहीस. ईथेच रहायचं. " तेव्हा सुमन मावशीच म्हणाली, " सोहम.. तिचं graduation होऊ दे तिकडेच. मग येईलच ती. तुम्हीसुद्धा नवीन सुरवात करताय. जरा वेळ द्या एकमेकांना."

पूजा झाली त्यादिवशी तुझी आई माझ्याकडे आली. मला म्हणाली, " हे बघ. तुझ्या पुर्वायुष्याबद्दल मी काही विचारणार नाही तुला. माझ्या लेकाबरोबर तू नवी सुरवात करत्येस. माझे आणि सोहमच्या बाबांचे आशिर्वादच आहेत तुम्हाला. पण काही गोष्टी स्पष्ट करूया. तुझं वय आहे 39 आणि सोहमच 35. तो काही म्हणणारही नाही कदाचित पण त्याचंही स्वतःचं मुल असावं असं मला वाटतं. खोटं कशाला बोलू? आम्हाला हवय नातवंडाचं सुख. सोहमलाही फार आवड आहे लहान मुलांची. सिंगापूरहून भाचे कंपनी आली की मामाच्या कडेवरच असते.. तू पाहिलयस. मी बळजबरी नाही करणार पण आणखी उशीर केलात तर तुला जड जाऊ शकतं. " माझ्या डोक्यावर हात फिरवत त्या म्हणाल्या.

त्यानंतर वर्षभरात प्रीतीचा जन्म झाला. माझी प्रिया म्हणून तू हौसेने नाव ठेवल होतस आपल्या लेकीचं ' प्रीती.' तुझ्यासारखाच गाता गळा होता बाईंचा. फार लाडाची लेक होती सोहम डॅडूची. प्रिया तर ईतकी खुश होती. सारखी तिला उचलून घ्यायची. प्रियाचं graduation झालं आणि ती आपल्याकडे आली. प्रीती तेव्हा तीन वर्षांची होती. पुढं post graduationही झालं प्रियाचं आणि एक दिवस पठ्ठी कार्तिकला आपल्याकडे घेऊन आली. कार्तिक दामोदरन. साऊथ इंडियन. दोघांनी ठरवलं होतं लग्न करायचं. फार आधीपासून म्हणे. आपण विरोध करायचा प्रश्नच नव्हता. Highly Educated होता कार्तिक. त्याची familyपण गोड होती. लग्न करून प्रिया कार्तिकबरोबर U. S. ला गेलीसुद्धा. 25 वर्षांची नवरीमुलगी प्रिया आणि तिची करवली प्रीती सहा वर्षांची. सगळं खूप छान पार पडलं पण.

इकडे आपलही आयुष्य छान सुरू होतं. तुझे आई बाबा आश्रमशाळांचं काम करायचे... रिटायरमेंटनंतर. समाजसेवेचा जणू वसाच घेतला होता त्यांनी. मी ही त्यांना जाॅईन झाले. प्रीतीसुद्धा मोठी होत होती. गाणं तर रक्तातच होतं तिच्या. तुझ्याबरोबरची वीस वर्ष पिसासारखी झर्रकन उडून गेली. खूप फिरलो आपण. पृथ्वीप्रदक्षिणाच केली होती. माझ्या लिखाणाला आणि तुझ्या गाण्यालाही खूप पुढे घेउन गेलास तू. खूप सुख दिलस मला. गतआयुष्याची आठवण काढून रडले असा एकही दिवस येऊ दिला नाहीस तू. प्रीतीचा लाडका डॅडू... प्रियाचा आणि तिच्या लेकाचा सोहम सर होतास तू. खूप तृप्त जगले मी तुझ्यासोबत. ईतकी तृप्त सोहम....... की आज असा डोळे

मिटून निपचित पडलायस माझ्यासमोर... न हलता.. न बोलता. तरीही मन शांत आहे माझं. तुझ्याशी लग्न करून काय मिळालं मला याचं उत्तर आत्ता.. असं मिळतय.. मनःशांती मिळाली. तृप्ती मिळाली. कधीही न संपणारी.

प्रिया, प्रीती खूप रडतायत. कार्तिक सुन्न बसलाय. त्याचा तर अगदी खास दोस्त झाला होतास तू. प्रियाचा छोटाही कावराबावरा झालाय. सोहम सर उठत नाहीयेत म्हणून. तुला एक गंमत सांगू?? केदार येऊन गेला. तुला भेटायला. आणि चक्क रडला रे... सोहम.  केदार रडला... केदार ! पण मी नाही रडणार. आपल्या प्रीतीला मार्गी लावायचय. आश्रमशाळांची सगळी मदार माझ्यावर आहे आता. तुझे बाबा गेले आणि ते सगळं मी माझ्याकडे घेतलं. आता मी सगळं निभावणार. तू मला बोलवून घेईपर्यंत.

तू तुझा शब्द पाळलास सोहम. सावलीसारखी सोबत करीन म्हणाला होतास. आणि केलीसही. बघ ना आता तू नाहियेस तरी तुझी माझ्या आयुष्यावर आभाळ होऊन पसरलेली सावली तशीच आहे. तुझी लेक, तुझा गाण्यातला आवाज, माझं लिखाण यात तू आणि तूच आहेस.. सावलीसारखा. मी सांभाळेन हे सगळं.

तू ऐकतोयस ना?

(समाप्त)

©शिवानी गोखले.

# Certificate of Registration

**This is to certify that I have registered this Story**

**titled Guldasta**

**Written by Shivani Gokhale**

**Whose SWA Membership No. is 034023**

**On 06/05/2018**

**& as a proof thereof is placed below my digital signature and**

**seal of the Association with relevant details in the QR code.**

**(CC Avenue) Reference No.:107366714047 and Order Id:034023-1**

**ZAMAN HABIB**

**(General Secretary SWA)**

**Note - This certificate is subject to the declaration by the writer that This work is my original creation. I hereby declare that I have neither read it anywhere nor watched it in any Film/TV show. In case it is found otherwise I understand that my registration of this work will automatically stand cancelled and I will be solely responsible for the consequences whatsoever.**

**Tampering with document cancels the digital signature & thus the registration.**

 © Shivani Gokhale